
दैनिक

चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी



❊ वर्ष : ०१ ले ❊ | ❊ अंक : १०१ ❊ | ❊ शुक्रवार १३ नोव्हेंबर २०२६ ❊ | ❊ जालना ❊ | ❊किंमत : २ रूपये ❊ | ❊पृष्ठे : ४ ❊

◎Volume 01◎ | ◎ Issue 101 ◎ | ◎ Friday, Date : 13 November 2026 ◎ | ◎ Jalna ◎ | ◎Price Rs. 2 ◎ | ◎Pages 4 ◎

शेतकऱ्यांच्या घरी जाऊन आ. बबनराव लोणीकरांनी साजरा केला दिवाळी पाडवा

परतूर : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांना संकटातून दिलासा देण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जमा केलेली पाच हजार रुपयांची अग्रीम मदत आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे जमा झालेले हप्ते यामुळे दुष्काळी परिस्थितीत शेतकरी कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळाला आहे. शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरावा, पाण्याची नासाडी टाळावी आणि पाण्याचे योग्य नियोजन करावे, असे आवाहन माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने शेतकऱ्यांच्या घरी जाऊन त्यांच्यासोबत सण साजरा करण्याचा आनंद वेगळाच आहे. शेतकरी हा आपल्या समाजाचा आणि अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याच्या आयुष्यात सुख-दुःखाचे प्रसंग आले तर लोकप्रतिनिधी



म्हणून त्याच्या पाठीशी उभे राहणे आपले कर्तव्य आहे. यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांसमोर अनेक अडचणी आहेत. अशा वेळी त्यांच्या समस्या समजून घेणे, त्यांना धीर देणे आणि शासनाच्या माध्यमातून आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे, असेही आमदार लोणीकर यांनी सांगितले.

दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो. शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य कुटुंबांना याचा सामना करावा लागतो. त्यामुळे प्रत्येकाने उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा. पाणी हेच शेतीचे आणि ग्रामीण जीवनाचे प्रमुख साधन असून भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन आजपासूनच त्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही



संकटात खचून न जाता धैर्याने परिस्थितीचा सामना करावा, फडणवीस सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा विश्वास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या घरी जाऊन साजरा केला दिवाळी पाडवा दिवाळी हा आनंद, उत्साह,

ओबीसी, ईबीसी व डीएनटी विद्यार्थ्यांसाठी पीएम यशस्वी शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाइन

विद्यार्थ्यांनी ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

जालना/प्रतिनिधी : इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'पीएम यशस्वी प्री-मॅट्रिक व पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती' योजनांची अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. या योजनांसाठी विद्यार्थ्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल (छड्झ) तसेच महाडीबीटी २.० (MahaDBT २.०) पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत. प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इयत्ता नववी व दहावीमध्ये शिकणाऱ्या ज्या मुला-मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत. पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त असलेल्या इयत्ता नववी व दहावीतील मुलींनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत. तसेच इयत्ता पाचवी व आठवीतील मुलींचे शिष्यवृत्ती अर्जही पूर्वीप्रमाणे सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर भरता येतील. याशिवाय जिल्हा परिषद माध्यमिक शाळांमधील व्हीजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, तसेच सैनिकी शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता अशा योजनांचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवर पूर्ववत भरता येणार आहेत.

पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी ओबीसी, एसबीसी व व्हीजेएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज केवळ एनएसपी पोर्टलवर भरावेत. या योजनांसाठी नवीन अर्ज करण्याची सुविधा महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध राहणार नसल्याची सूचना देण्यात आली आहे. यामध्ये ओबीसी, एसबीसी व व्हीजेएनटी विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसह व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्गीय मुलींच्या शिष्यवृत्तीचा समावेश आहे. महाडीबीटी पोर्टलवर पूर्ववत अर्ज करता येणाऱ्या योजनांमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या व्हीजेएनटी व एसबीसी विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता, ओबीसी, एसबीसी व व्हीजेएनटी विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती, तसेच या तिन्ही प्रवर्गांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनांचा समावेश आहे. शासकीय तसेच खासगी आयटीआयमध्ये प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनाही व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचा लाभ घेता येणार आहे. अर्ज व पडताळणीचे वेळापत्रक : एनएसपी पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज प्रक्रिया १७ जुलै २०२६ पासून सुरू झाली असून, विद्यार्थ्यांना ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. त्रुटी असलेल्या अर्जांची पडताळणी (पान ३ वर)

५ हजार बालके मुंबईत कुपोषित; ही बाब अत्यंत शरमेची!

मुंबई: मुंबईत मध्यम कुपोषित बालकांची संख्या ५ हजार असून ही बाब आपल्या सगळ्यांसाठी अत्यंत शरमेची आहे, अशी स्पष्ट शब्दांत खंत व्यक्त करत मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी 'कुपोषणमुक्त मुंबई' अभियान राबवण्याचे निर्देश दिले आहेत. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुंबई उपनगर




जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह विविध विभागांचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

एसआरएने हाती घ्यावा स्वतंत्र कार्यक्रम ज्याप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (ड्ठ-) 'झोपडपट्टीमुक्त (पान ३ वर)

शेतकरी कुटूंबातील तरुणाची आकाशाला गवसणी!

हातडीच्या अक्षत काळेची इंडिगो एअरलाईन्समध्ये ज्युनिअर पायलट म्हणून निवड; परतूर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

परतूर । प्रतिनिधी : जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर स्वप्नांना गवसणी घालता येते, याचा प्रत्यय परतूर तालुक्यातील हातडी गावच्या अक्षत काळे यांच्या यशातून आला आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या अक्षत यांनी थेट आकाशात भरारी घेण्याचे स्वप्न साकार केले असून, देशातील नामांकित इंडिगो एअरलाईन्समध्ये ज्युनिअर पायलट म्हणून त्यांची निवड झाली आहे. त्यांच्या या यशाने हातडी गावासह संपूर्ण परतूर तालुक्याची मान अभिमानाने उंचावली आहे. ग्रामीण भागात शिक्षण घेत मोठी स्वप्ने पाहणाऱ्या तरुणांसाठी अक्षत यांचा प्रवास प्रेरणादायी ठरणारा आहे. हातडी येथील माजी सरपंच श्यामसुंदर रामराव काळे यांचे ते पुतणे, तर अभिजीत गोविंदराव काळे यांचे सुपुत्र आहेत. शेतीशी नाळ जोडलेल्या कुटुंबातून आलेल्या अक्षत यांनी विमानचालन क्षेत्रात करिअर



करण्याचा ध्यास घेतला. त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण पूर्ण करत त्यांनी आपल्या मेहनतीच्या बळावर प्रतिष्ठित विमान कंपनीत स्थान मिळवले. माती हातडीची, भरारी मात्र आकाशात! ग्रामीण भागातील (पान २ वर)

हेलस प्रीमियर लीग २०२६ क्रिकेट स्पर्धेचा श्रीराम मैदानावर भव्य शुभारंभ

उंबरखेडा येथील सरपंच आनंद जाधव यांच्या हस्ते संपन्न

गजानन माळकर पाटील तालुका प्रतिनिधी मंठा : मंठा तालुक्यातील हेलस येथील श्रीराम मैदानावर 'हेलस प्रीमियर लीग २०२६' या भव्य क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ आज मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला.उबरखेडा येथील सरपंच आनंद जाधव यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी बोलताना उद्घाटक म्हणाले की, क्रिकेट हा केवळ खेळ नसून तो शिस्त, संघभावना, जिद्द आणि खिलाडूवृत्ती शिकवणारे एक उत्तम माध्यम आहे. या स्पर्धेत सहभागी सर्व संघांनी



खिलाडूवृत्तीने खेळावे. या निमित्ताने गावात एकी, आनंद आणि उत्साहाचे वातावरण राहावे, हीच मनापासून इच्छा आहे. प्रत्येक खेळाडूने विजयासाठी जिद्दीने खेळून आपल्या उत्कृष्ट कामगिरीने गावाचे नाव उज्ज्वल करावे. यावेळी त्यांनी सर्व सहभागी संघ, खेळाडू, संघमालक, आयोजक आणि क्रिकेटप्रेमींना पुढील (पान ३ वर)

१० जणांचा जीवघेणा हल्ला

मुंबई: दिवाळीच्या आनंदात मग्न असलेल्या मुंबई शहरातून एक अत्यंत संतापजनक आणि हादरवून टाकणारी घटना समोर आली आहे. मुंबईतील अंधेरी पूर्व भागातील मरोळ परिसरात फटाके फोडण्याच्या क्षुल्लक कारणावरून एका कुटुंबावर ८ ते १० जणांच्या झुंडीने अमानुष हल्ला केल्याची घटना घडली आहे. या भीषण मारहाणीत पती-पत्नी आणि त्यांची लहान मुलगी असे तिघेही गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी तातडीने कारवाई करत चार जणांना अटक केली असून, या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरत आहे. नेमकी घटना काय घडली? मिळालेल्या माहितीनुसार, अंधेरी पूर्व येथील कृष्ण नगर भागात (पान २ वर)

भोकरदनमध्ये भरधाव दुचाकीची पादचाऱ्याला धडक; ५२ वर्षीय व्यक्ती गंभीर जखमी


तब्बल एक महीन्याने आरोपीवर गुन्हा दाखल

भोकरदन : प्रतिनिधी : भोकरदन शहरातील भोकरदन-जालना रोडवरील पवन डेली निडर्स दुकानासमोर भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकीने पादचाऱ्याला पाठीमागून जोराची धडक दिल्याची घटना १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६.४० वाजेच्या सुमारास घडली. या अपघातात सुनील यादव गायकवाड (वय ५२, रा. रमाईनगर, भोकरदन) हे गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी फिर्यादी अभिजित सुनील गायकवाड (वय २८, रा. रमाईनगर, भोकरदन) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे वडील सुनील गायकवाड हे किराणा सामान घेण्यासाठी जात असताना एच.एफ. डिलक्स मोटारसायकल क्रमांक MH-२१-CH-६२७३ वरील चालकाने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून त्यांना पाठीमागून धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी झाले.

या प्रकरणी भोकरदन पोलीस ठाण्यात आज दि. १२ रोजी गुन्हादाखल केला असून रजिस्टर क्रमांक ६००/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २८१, १२५ (अ) व १२५ (ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या आदेशानुसार पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल जायभाये (बक्कल क्रमांक १२५३) करीत आहेत. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सफौ देशपांडे यांनी केली आहे.

गुप्तधनाच्या हव्यासापोटी शेतात अघोरी विधी!

परतूर, प्रतिनिधी : गुप्तधन मिळविण्याच्या हव्यासापोटी शेतात मांत्रिकामार्फत अघोरी विधी सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार परतूर तालुक्यातील टाकळखोरे पोखरी / माहोरा परिसरात उघडकीस आला आहे. मध्यरात्रीच्या सुमारास सुरू असलेल्या या संशयास्पद प्रकाराची माहिती मिळताच परतूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत कारवाई केली. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. दिनांक ११ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री सुमारे १२.५० वाजता परतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टाकले पोखरी / माहोरा परिसरातील एका शेतात गुप्तधन मिळविण्याच्या उद्देशाने मांत्रिकामार्फत पूजा व विविध अघोरी विधी सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. यावेळी शेतामध्ये काही व्यक्ती संशयास्पदरीत्या विधी करताना आढळून आल्या. पोलिसांनी संबंधित व्यक्तींकडे चौकशी केली असता, गुप्तधन मिळविण्याच्या उद्देशाने मांत्रिकामार्फत पूजा व विविध



विधी केले जात असल्याचे समोर आले. घटनास्थळावरून विधीसाठी वापरण्यात येणारे लिंबू, हळद, कुंकू, सुपारी तसेच खोदकामासाठी वापरण्यात येणारी छन्नी, हातोडा, कुदळ व इतर साहित्य आढळून आले. या प्रकरणी फिर्यादी यांच्या तक्रारीवरून महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अधिनियमांतर्गत तसेच संबंधित कायद्याच्या लागू तरतुदींनुसार गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. अंधश्रद्धेच्या प्रकारांपासून सावध राहण्याचे पोलिसांचे आवाहन गुप्तधन मिळवून देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची दिशाभूल करणाऱ्या तसेच समाजात अंधश्रद्धा आणि अघोरी प्रथांना प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तींपासून नागरिकांनी सावध राहावे. अशा प्रकारची माहिती मिळाल्यास तात्काळ परतूर पोलीस (पान ३ वर)

ॲड. महेश धन्नावत व श्लोक अग्रवाल यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची सदिच्छा भेट

जालना/प्रतिनिधी : दिवाळीनिमित्त प्रसिद्ध विधिज्ञ ड. महेश धन्नावत आणि श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची गुरुवार दि. १२ नोव्हेंबर रोजी वडीगोद्री (ता. अंबड) येथे सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी जरांगे पाटील यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिक शक्ती लाभावी, अशा शुभेच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

याप्रसंगी ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, आज शेतकरी, शेतमजूर आणि गरीब कुटुंबे आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. अशा कठीण परिस्थितीत जनतेच्या प्रश्नांसाठी कार्य करणाऱ्या



व्यक्तींना अधिक बळ मिळणे आवश्यक आहे. मनोज जरांगे पाटील यांना शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी आपले सर्वोत्तम योगदान देता यावे, हीच आमची ईश्वरचरणी प्रार्थना आहे. दिवाळीचा खरा आनंद स्वतःचे घर उजळविण्यात नसून गरजूंच्या जीवनात आशेचा प्रकाश निर्माण करण्यात आहे. श्लोक अग्रवाल म्हणाले की, दिवाळी हा माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीचा सण आहे. दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकरी व गरजू कुटुंबांच्या पाठीशी समाजाने उभे राहिले पाहिजे. मनोज जरांगे पाटील यांना उत्तम आरोग्य आणि अधिक शक्ती लाभो, जेणेकरून ते शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी अधिक जोमाने कार्य करू शकतील. समाजातील शेवटच्या गरजू व्यक्तीच्या चेहऱ्यावर हास्य फुलले, तर तीच खरी दिवाळी ठरेल. दिवाळीच्या निमित्ताने झालेल्या या सदिच्छा भेटीतून सामाजिक एकोपा, परस्पर आदर आणि शेतकरी व सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याचा संदेश देण्यात आला.

संपादकीय


सरकार झाड लावणार कुठ ?

आज राजकीय पुढाऱ्यांजवळ वाममार्गाने कमविलेली शेकडो हेक्टर जमीन आहे त्यावर सरकार वृक्ष लागवड का करीत नाही? सरकार म्हणते की,स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून त्यातून मार्ग काढला जाईल, सरकार प्रकल्पासाठी हजारो झाडे कापण्याच्या तयारीत आहे आणि ग्रामस्थांशी चर्चा करण्याची भाषा करतात हा सर्व सरकारचा लपंडाव सुरू असल्याचे दिसून येते.जर शिवरायांचा इतिहास आणि जागतिक वारसा जीवीत ठेवायचा असेल तर, टोरंट प्रकल्पाला थांबविण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राने पेटून उठले पाहिजे व यापुढे टोरंट सारखे प्रकल्प थांबवुन निसर्ग वाचविला पाहिजे आणि याचे पालन वनविभागाने सुध्दा केले पाहिजे.कारण आज जंगल तोडीमुळे अनेक पशुपक्षांचे घरे उद्धस्त झाली आहेत व त्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे याची जाणीव सरकारने व वनविभागाने ठेवली पाहिजे.सरकारने प्रकल्प अवश्य उभारावे याला कोणाचाही विरोध नाही.परंतु निसर्गाची राखरांगोळी होणार नाही याचीही खबरदारी सरकारने घेतली पाहिजे. कारण एक झाड मोठे व्हायला कमीत कमी ५ ते १० वर्षाचा कालावधी लागतो म्हणजे(१८२५ ते ३६५० दिवस)आणि ५ ते १० वर्षाचा कालावधी म्हणजे कमी नाही याची जाणीव सरकारने ठेवली पाहिजे.आज सरकार मोठ्यांने दावे करीत आहे की, आम्ही मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करीत आहोत. परंतु सत्यपरिस्थिती अशी आहे की, फक्त फोटो सेशन पुरते वृक्षारोपण असते त्यानंतर त्या वृक्षांकडे कोणताही राजकीय पुढारी ढुंकूनही पाहत नाही ही सत्य परिस्थिती आहे. त्यामुळे सरकारच्या मार्फत होणारे ९० टक्के वृक्षारोपण हे फक्त कागदावरच असते व १० टक्के वृक्षारोपण जमिनीवर होते.त्यामुळे सरकारच्या करणीत आणि कथनीमध्ये जमीन-आसमानचा फरक आहे.

टोरंट पॉवर प्रकल्प भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर, तर भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिरापासून २० किलोमीटर अंतरावर जरी असला तरी या प्रकल्पाचा मोठा धोका वन्यजीव प्राण्यांना व पर्यटकांना होईल यात तिळमात्र शंका नाही.आज वृक्षतोडीमुळे अनेक औषधीयुक्त वृक्ष लुप्त झाली आहेत व काही झाडे लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.त्याचप्रमाणे अनेक पशुपक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत किंवा त्यांची संख्या कमी झाली आहे.अशी भयावह गंभीर परिस्थिती वृक्षतोडीमुळे राज्यासह देशात निर्माण झाली आहे.त्यामुळे सरकारने वन्यप्राण्यांची घरे उद्धस्त होणार नाही व त्यांच्या जीवाला धोका निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे; सोबतच हवामानातील वाढता बदल पहाता व स्थल ,जल, वायू प्रदूषणाचा वाढता प्रभाव लक्षात घेता निसर्गाची जोपासना करण्याचा संकल्प सरकारने घेतला पाहिजे व टोरंट प्रकल्पाला ताबडतोब स्थगिती देऊन निसर्गाचे व वन्यप्राण्यांचे रक्षण व्हायला हवे.

सरकार प्रकल्प उभारल्यानंतर झाडे लावण्याचे जे दावे करतात ते संपूर्ण दावे खोटे व फोल असल्याचे मी समजतो आणि हेच काम सरकार कर्जत तालुक्यातील टोरंट पॉवर प्रकल्पाच्या बाबतीत करीत आहे.सरकार म्हणते की, टोरंट प्रकल्पाला लागणारी २५३ हेक्टर जमीनीच्या बदलत्या, दुसऱ्या २५३ हेक्टर पर्यायी जमिनीवर ९० हजार झाडे लावणार असल्याचे सरकार सांगत आहेत.मला हे समजत नाही की,जमीन काय झाडांना लागते का? अचानक २५३ हेक्टर जमीन सरकार उपलब्ध करून देणार कोठून आणि आता लावलेली झाडे मोठी व्हायला कमीत कमी दहा वर्षे लागतील याचा विचार सरकार का करीत नाही?सरकारच्या या प्रकल्पावरून सिध्द होते की, सरकार जी झाडे लावण्याची गोष्ट करीत आहे ती फक्त कागदावरच राहिल कृतीत होने कदापि शक्य नाही असे माझे स्पष्ट मत आहे.जो रायगड जिल्हा जगप्रसिद्ध आहे व ज्या भुमित शिवाजी महाराजांचा इतिहास दडलेला आहे अशा हिरवागार गालिचा सरकार विकासाच्या नावाखाली नेस्तनाबूत करीत असेल तर ही बाब कोन्हिही सहन करणार नाही.सरकारने जर जबरदस्तीने वृक्षतोड केली तर,संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठल्या शिवाय रहाणार नाही ही बाब सरकारने व वनविभागाने लक्षात ठेवली पाहिजे. देशातील काही राज्यांत ओला दुष्काळ तर काही राज्यांत कोरडा दुष्काळ दिसून येत आहे.एवढे सर्व गंभीर परिणाम पृथ्वीवर सरकारला दिसत असून सुद्धा नवीन प्रकल्पाच्या उभारणीसाठी लाखों वृक्षांची कत्तल सरकार करण्याच्या तयारीत सरकार आहे ही अत्यंत शरमेची आणि लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल. राज्यासह देशात विकासाच्या नावाखाली अंदाधुंद वृक्षांची कत्तल होत आहे.याचे जिवंत उदाहरण रायगड जिल्ह्यातील कर्जतमधील टोरंट प्रकल्प सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. एकीकडे वृक्ष कटाईमुळे ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी कमी होत असुन सर्वांचा जीव गुदमरत आहे;तर दुसरीकडे प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे यामुळे मानव व पशुपक्षांचे जगणे कठीण झाले असून सर्वांच्याच आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.सध्याच्या परिस्थितीत देशासह राज्यात विकासाच्या नावाखाली वृक्षांची बेसुमार कटाईचा सपाटा जोरदार सुरू आहे त्यामुळे असे वाटत आहे की,देशात हे चाल्लय तरी काय! झाडांची अशीच कत्तल होत रहाली तर असे समजायला हरकत नाही की, माणसातील माणुसकी हरपली व मानुस माणुसकीत न रहाता जनावरापेक्षा निपत्तर झाला आणि माणुसकी संपुष्टात आली असे म्हणायला हरकत नाही. आज सर्वांच्याच आरोग्याच्या दृष्टीने ज्याची नितांत गरज आहे अशा वृक्ष देवतेची व पृथ्वी मातेची सरकार व वनविभाग सरेआम अवहेलना करीत असून कत्तल करीत आहे.यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतुंनी स्वास घ्यायचा कसा असा गंभीर आणि जटील प्रश्न देशापुढे व देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे उपस्थित होत आहे. आज आपल्यालाच नाही तर सर्वांनाच निसर्गामुळे म्हणजेच वृक्षांमुळे नैसर्गिक ऑक्सिजन मिळत आहे व सर्वत्र सुखशांती दिसून येते.परंतू देशासह राज्यात अनेक प्रकल्प उभारून प्रदूषणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने संपूर्ण पृथ्वीतलावरील जीवजंतूचा जीव धोकादायक स्थितीत येऊन ठेपला आहे.सरकारने गेल्या काही वर्षांत निसर्गाचे संपूर्ण वाटोळे केले असून त्याचा परिणाम म्हणून,वनवे लागने,भुस्खलन,अती उष्णता,पिण्याच्या पाण्याची पातळी कमी होणे इत्यादी अनेक समस्यांनमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून यांचे गंभीर परिणाम अलनिनोच्या माध्यमातून राज्यासह देशात दिसत आहे. सरकारने अनेक प्रकल्पांचा सपाटा लावला असला तरी अनेक प्रकल्पांच्या तुलनेत वृक्षलागवड नगन्य असल्याचे दिसून येते. कारण प्रश्न असा उद्भवतो की, जमीनीवर अवाढव्य प्रकल्प उभारल्यानंतर सरकार झाडे लावणार कुठे?

घर बांधायला पैसे नाहीत ? मग काळजी कशाला ? 'रमाई आवास' घरकुल योजना आहे ना !



राज्य सरकारने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत 'रमाई आवास (घरकुल) गृहनिर्माण योजना' सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती तसेच नवबौद्ध समाजातील शहरी आणि ग्रामीण भागातील बेघर व गरजू कुटुंबांना पक्के घर बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. अनुसूचित जाती आणि नवबौद्ध भगिनींसाठी राज्य सरकारची रमाई आवास घरकुल योजना म्हणजे एक मोठा आधार ठरत आहे. राज्यातील अनेक कुटुंबांकडे सुरक्षित निवारा नसल्यामुळे त्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते. ही समस्या दूर करण्यासाठी सरकारकडून ही मदत दिली जाते. तसेच, या योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना क्षेत्रानुसार साधारणपणे १ ते २ लाखांपर्यंत गृहनिर्माण अनुदान मिळते. त्यामुळे घर बांधण्याचा खर्च कमी होतो आणि कुटुंबांना मजबूत व सुरक्षित घर उभारणे शक्य होते.

ग्रामीण भागात किती मदत मिळते ?

या योजनेअंतर्गत घर बांधण्यासाठी सरकार दोन लाखांपर्यंतची मदत करतं, पण त्यासाठी काही अटी आणि नियम नीट समजून घेणं गरजेचं आहे. जर तुम्ही ग्रामीण भागात राहत असाल तर तुम्हाला एक लाखापर्यंतची मदत मिळते आणि विशेष म्हणजे यामध्ये लाभार्थ्याला कोणतेही स्वतःचे पैसे भरावे लागत नाहीत. शहरी भागात किती मदत मिळते ?

यामध्ये जर तुम्ही नगरपालिका क्षेत्रात राहत असाल तर दीड लाख रुपये आणि महानगरपालिका क्षेत्रात राहत असाल तर दोन लाख रुपयांची मदत मिळते, फक्त तिथे लाभार्थ्याला सात ते दहा टक्के हिस्सा स्वतःचा टाकावा लागतो. योजनेसाठी पात्रता काय ?

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की यासाठी नक्की पात्र कोण आहे ? तर सगळ्यात आधी म्हणजे अर्जदार हा महाराष्ट्राचा १५ वर्षांपासूनचा रहिवासी असला पाहिजे. त्यानंतर तुमचं वार्षिक उत्पन्न जर ग्रामीण भागात १ लाख, नगरपालिकेत दीड लाख आणि मोठ्या शहरात २ लाखांच्या आत असेल, तर तुम्ही या योजनेसाठी पात्र ठरता. याशिवाय तुमच्याकडे स्वतःची जागा असणं इथं खूप महत्त्वाचं आहे आणि तुमच्या कुटुंबात याआधी कोणीही अशा सरकारी घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

तसेच ज्यांच्याकडे पिवळं रेशनकार्ड आहे म्हणजेच जे दारिद्र्यरेषेखालील आहेत, त्यांना या योजनेत पहिलं प्राधान्य दिलं जातं. योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

जातीचा दाखला आणि रहिवासी दाखला. आधार कार्ड आणि बँक पासबुक झेरॉक्स. ७/१२ उतारा किंवा मालमत्ता पत्रक (झठ उरीव). तहसीलदारांचा उत्पन्नाचा दाखला. जागेची कागदपत्रे. अर्ज कसा करायचा ?

या योजनेचा फायदा घेण्यासाठी तम्ही तुमच्या जवळच्या समाज कल्याण कार्यालयात, जिल्हा परिषद किंवा नगरपालिकेत जाऊन अर्जाचा नमुना घेऊ शकता. अर्जासोबत जातीचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, आधार कार्ड आणि जागेचे कागदपत्रं जोडणं विसरू नका. अर्ज भरून झाल्यावर तो संबंधित ऑफिसमध्ये जमा करा आणि तिथून आपली पोचपावती घ्या. दरम्यान, आता या योजनेचा लाभ घेण्यासाठी तुम्ही 'महाआवास' पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

आजपासून थंडीची हुडहुडी भरणार!



महाराष्ट्रातील हवामानात सध्या सातत्याने मोठे बदल होत असून उत्तरेकडील थंड वाऱ्यांचा प्रभाव आता थेट राज्यातील वातावरणावर जाणवू लागला आहे. दिवाळीचा सण संपल्यानंतर आता तापमानाचा पारा झपाट्याने घसरत चालला असून येत्या काही दिवसांत राज्यातील तापमानात दोन ते तीन अंशांची मोठी घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार १३ नोव्हेंबर रोजी राज्यभरात हवामान मुख्यत्वे कोरडे आणि निरभ्र राहणार आहे. या बदलत्या वातावरणामुळे नागरिकांना दिवसा कडक उन्हाचे चटके सहन करावे लागणार आहेत, तर पहाटे आणि रात्रीच्या वेळी हुडहुडी भरवणारा गारवा किंवा गुलाबी थंडी जाणवणार आहे. कोकणापासून विदर्भापर्यंत सर्वच विभागांमध्ये या थंडीच्या लाटेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येणार आहे. उत्तर आणि दक्षिण कोकणात शुक्रवारी हवामान पूर्णपणे कोरडे आणि आकाश पूर्णपणे निरभ्र राहणार असून दिवसा उन्हाचा चांगलाच चटका जाणवेल. या भागातील कमाल तापमान ३३ ते ३५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान तर किमान तापमान १८ ते २४ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे आणि यादरम्यान पावसाची कोणतीही शक्यता वर्तवण्यात आलेली नाही. दुसरीकडे, दक्षिण मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांत किमान तापमानात सातत्याने घट होत चालली आहे. दिवसभर हवामान पूर्णपणे कोरडे राहून लख्ख ऊन पडेल आणि येत्या दोन दिवसांत किमान तापमानात एक ते दोन अंशांची घट होऊन पहाटेच्या वेळी गारठा वाढणार आहे. उत्तर मध्य महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहिल्यानगर या भागात देखील आकाश निरभ्र राहणार असून या पट्ट्यात थंडीचा प्रभाव सर्वाधिक जाणवत आहे. रात्रीच्या वेळी तापमानात दोन ते तीन अंशांची घट होण्याची दाट शक्यता आहे. मराठवाड्यात देखील हवामान पूर्णपणे निरभ्र आणि कोरडे राहणार असून छत्रपती संभाजीनगरसह जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड आणि परभणी या जिल्ह्यांमध्ये पावसाची कोणतीही शक्यता नाही. कोरड्या हवामानामुळे आणि स्वच्छ सूर्यप्रकाशामुळे सध्या शेतीकामांसाठी अत्यंत पूरक वातावरण तयार झाले आहे. विदर्भातील नागपूर आणि अमरावतीसह सर्वच जिल्ह्यांमध्ये हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे. येथील कमाल तापमान ३४ अंशांच्या आसपास राहील तर किमान तापमान १८ अंश सेल्सिअसपर्यंत खाली घसरण्याची शक्यता आहे. एकंदरीत विचार केल्यास, पाऊस पूर्णपणे थांबल्यामुळे आणि आकाश निरभ्र राहिल्यामुळे सूर्यप्रकाश थेट जमिनीवर पडत आहे, ज्यामुळे दुपारी उन्हाचा चटका वाढला आहे. मात्र, रात्रीच्या वेळी जमिनीवरील उष्णता वेगाने निघून जात असल्याने पहाटेच्या सुमारास तीव्र गारवा किंवा गुलाबी थंडी अनुभवायला मिळत आहे. पुढील काही दिवसांत हा गारठा आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

पान 1 वरून

शेतकऱ्यांच्या घरी जाऊन आ.

आणि सामाजिक बांधिलकीचा सण आहे. मात्र यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांसमोर अनेक आर्थिक आणि नैसर्गिक संकटे उभी आहेत. अशा परिस्थितीत केवळ स्वतःच्या कुटुंबासोबत सण साजरा न करता शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहोचून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा संवेदनशील उपक्रम आमदार बबनराव लोणीकर यांनी राबविला.

दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने त्यांनी परतवडी येथील शेतकरी रमेश आढे यांच्या घरी भेट दिली. यावेळी आढे कुटुंबीयांसमवेत स्नेहभोजन करून दिवाळी पाडवा साजरा केला. लोकप्रतिनिधी आणि सामान्य शेतकरी यांच्यातील नाते अधिक दृढ करणारी ही भेट ठरली. या भेटीचा उद्देश केवळ दिवाळीच्या शुभेच्छा देण्यापुरता मर्यादित नव्हता, तर शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेणे आणि त्यांना विश्वास देणे हा होता.

यावेळी आमदार लोणीकर यांनी शेतकऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेती व्यवसायावर झालेले परिणाम, पिकांची स्थिती, पाणीटंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याचे नियोजन तसेच ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबांना भेडसावणाऱ्या आर्थिक अडचणी याबाबत त्यांनी माहिती घेतली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केवळ आकडेवारीच्या माध्यमातून न पाहता त्यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन परिस्थिती समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

गरजू शेतकरी कुटुंबांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न

दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने आमदार बबनराव लोणीकर यांनी परतवडी, पाटोदा आणि आष्टी येथे विशेष सामाजिक उपक्रम राबविला. या ठिकाणी विधवा, दिव्यांग, निराधार तसेच आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या गरजू शेतकरी कुटुंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अनेक कुटुंबांना दैनंदिन गरजा भागविताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा कुटुंबांच्या घरातही दिवाळीचा आनंद निर्माण व्हावा आणि सणाच्या काळात त्यांना काहीसा दिलासा मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सणासुदीच्या काळात मदतीचा हात देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांच्याशी आपुलकीचे नाते जपणे हीच खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी आहे. दिवाळीचा आनंद समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे, या भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. राजकीय पद आणि प्रतिष्ठेपेक्षा माणुसकीचे नाते महत्त्वाचे असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

पाच हजारांच्या अग्रीम मदतीमुळे शेतकऱ्यांना दिलासा

दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांसाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. पाच हजार रुपयांच्या अग्रीम मदतीमुळे तसेच लाडकी बहीण योजनेच्या हप्त्यांमुळे अनेक कुटुंबांना दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आर्थिक मदत मिळाली आहे. शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याच्या अडचणीच्या काळात सरकारने त्याच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. फडणवीस सरकारची भूमिका शेतकरीहिताची असून संकटाच्या काळात शेतकऱ्यांना मदत आणि आधार देण्याचे काम सरकार करीत राहील, असा विश्वास आमदार लोणीकर यांनी व्यक्त केला.

आढे कुटुंबीयांनी आमदार लोणीकरांचे केले स्वागत, आमच्यासारख्या गरीब शेतकऱ्याच्या घरी येऊन आमदार लोणीकरांनी दिवाळी साजरी केल्याने आमचा आनंद द्विगुणीत झाला असल्याची भावना व्यक्त केल्या

दरम्यान गावातील भगिनींनी पारंपरिक पद्धतीने औक्षण करून दिवाळी पाडवा साजरा केला

यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर, भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघन कणसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले भाजपा जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर , बाबासाहेब तेलगड रवींद्र सोळंके,प्रदीप ढवळे तुकाराम सोळंके, मधुकर मोरे, बबलू सातपुते बंडू मानवतकर गजानन लोणीकर, नितीन जोगदंड सिताराम राठोड, संभाजीराव खवल गणेशराव खवल संभाजी शिंदे बाळासाहेब लहाने दिगंबर गायकवाड, विष्णू गायकवाड, मनोज खवल, सुरेश पाटोतकर, गणेश महाराज, सतीश जगताप रामेश्वर जगताप, सतीश खवल, रमेश आढे कमल बाई आढे संतोष आढे विमल आढे आसाराम जगताप सुभाष जगताप शेषराव वाडी बाबू आडे अनिल व्यवहारे राजकुमार आडे रामेश्वर आडे भगवान मोरे राजेश आडे अनिल आढे यांच्यासह मोठ्या संख्येने माता भगिनी व शेतकऱ्यांची उपस्थिती होती

शेतकरी कुटूंबातील

अनेक तरुणांसमोर करिअरच्या मर्यादित संधी असल्याची भावना असते. मात्र, योग्य ध्येय, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि कुटुंबाचा पाठिंबा असेल तर गावखेड्यातील तरुणही मोठ्या क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करू शकतात, हे अक्षत यांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या यशामुळे हातडी गावातील तरुणाईला नवी प्रेरणा मिळाली आहे. आपल्या यशाबद्दल अक्षत यांनी कुटुंबीय, शिक्षक आणि मित्रांचे आभार मानले. कुटुंबाचा विश्वास, गुरुजनांचे मार्गदर्शन आणि मित्रांची साथ यामुळेच हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवता आले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. अक्षत यांच्या निवडीची बातमी समजताच हातडी गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध क्षेत्रांतील मान्यवर, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ आणि मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. गावाच्या मातीतून आकाशात झेप घेणाऱ्या अक्षत काळे यांची ही भरारी केवळ एका कुटुंबाचा आनंद नसून संपूर्ण परतूर तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे!

ओबीसी, ईबीसी व डीएनटी

तसेच संस्थास्तरावरील पडताळणी १५ डिसेंबर २०२६ पर्यंत, तर जिल्हा व संबंधित विभागीय स्तरावरील पडताळणी ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज करताना विद्यार्थ्यांनी संबंधित शाळा व महाविद्यालयांची नोंदणी एनएसपी पोर्टलवर झालेली असल्याची खात्री करावी. अन्यथा संबंधित शाळा किंवा महाविद्यालय अर्ज भरताना यादीत दिसणार नाही. त्यामुळे सर्व शाळा व महाविद्यालयांनी पोर्टलवर आपली नोंदणी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज भरून शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी तथा सहाय्यक संचालक कार्यालय, जालना यांच्यावतीने करण्यात आले आहे.

१० जणांचा जीवघेणा

गुप्ता कुटुंबीय राहत असून त्यांची लहान मुलगी घराबाहेर मोकळ्या जागेत फटाके फोडत होती. यादरम्यान, बादल गोस्वामी नावाच्या व्यक्तीने लहान मुलीला फटाके फोडण्यास मज्जाव केला आणि तिच्याशी अरेरावी करत कुटुंबाला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. हा वाद इतक्यावरच थांबला नाही. बघता बघता या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. काही वेळातच ८ ते १० जणांचा ग्रूप तिथे जमा झाला आणि त्यांनी गुप्ता कुटुंबावर हल्ला केला. महिला आणि चिमुरडीलाही बेदम मारहाण या हिंसक हल्ल्यात आरोपींनी सर्व मर्यादा ओलांडल्या. हल्लेखोरांनी महिलेला धक्काबुक्की करत खाली पाडले आणि लाथा-बुक्क्यांनी तसेच लाठ्या-काठ्यांनी तिला बेदम मारहाण केली. आपल्या पत्नीला वाचवण्यासाठी पुढे आलेल्या पतीवरही या टोळीने प्राणघातक हल्ला केला. एवढेच नव्हे तर, या वादात मध्ये पडलेल्या त्यांच्या लहान मुलीलाही सोडले नाही, तिलाही मारहाण करण्यात आली. या अमानुष मारहाणीत संपूर्ण कुटुंब गंभीर जखमी झाले आहे. हल्ल्यानंतर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या जखमी कुटुंबाला उपचारासाठी तात्काळ जोगेश्वरी येथील बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे मरोळ परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पोलिसांची कारवाई घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी तत्परता दाखवत तात्काळ गुन्हा दाखल केला. याप्रकरणी पोलिसांनी मुख्य सूत्रधारांसह चार जणांना बेड्या ठोकल्या आहेत, तर उर्वरित आरोपींचा शोध घेतला जात आहे. दिवाळीसारख्या सणाच्या दिवशीच मुंबईत घडलेल्या या हाणामारीच्या घटनेने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

गुप्तधनाच्या हव्यासा

ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन परिक्षेत्रीय पोलीस उपअधीक्षक तथा परतूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी रोहित कलमदाणे यांनी केले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी व उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली परिक्षेत्रीय पोलीस उपअधीक्षक रोहित कलमदाणे, पोलीस उपनिरीक्षक उद्धव चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक नंदू खंदारे, पोलीस अंमलदार अशोक गाढवे, सुरेश राठोड, महेश कोरडे, अतुल खंदारे, सुनील पवार व ज्ञानेश्वर वाघ यांनी केली.

हेलस प्रीमियर लीग

शुभेच्छा सरपंच आनंद जाधव यांनी दिल्या. या उद्घाटन सोहळ्यास हेलस गावचे सरपंच नामदेवराव बनसोडे, सोनाजी जाधव, केशवराव खराबे पाटील, कैलासराव खराबे, गजानन खराबे, ग्रामपंचायत सदस्य पवनराजे खराबे, स्वप्नील प्रधान, पोलीस पाटील भानुदास खराबे, आकाश खेत्रे, नवनाथ खराबे, गजानन डोंबे, आकाश जाधव, भागवत खराबे, अभिजीत खराबे, हेलस क्रिकेट कमिटीचे सर्व पदाधिकारी तसेच गावातील असंख्य खेळाडू व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

५ हजार बालके मुंबईत

मुंबई' असा संकल्प केला आहे, त्याच धर्तीवर आता झोपडपट्ट्यांमध्ये असणारे कुपोषण रोखण्यासाठी एसआरएने 'कुपोषणमुक्त मुंबई' असा स्वतंत्र कार्यक्रम हाती घ्यावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले आहेत. तसेच यासंदर्भातील सविस्तर कृती आराखडा येत्या पंधरा दिवसांत सादर करण्याचे आदेशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. एसआरए योजनांमधील झोपडपट्ट्यांमध्ये कुपोषित बालकांची संख्या कमी करण्याबरोबरच अंगणवाड्यांच्या जागेचा प्रश्नही कायमस्वरूपी सोडवावा, असे त्यांनी नमूद केले. यासाठी मुंबई महानगरपालिका, महिला व बालविकास विभाग आणि आरोग्य विभागाची मदत घ्यावी, असे सांगण्यात आले. महापालिकेला दिलासादायक व कठोर निर्देश ही गंभीर परिस्थिती बदलण्यासाठी मुंबई महापालिकेने सर्व संबंधित प्राधिकरणे आणि शासकीय यंत्रणांशी समन्वय साधून एक ठोस कृती आराखडा तयार करावा आणि महिन्याभरात अहवाल सादर करावा, असे निर्देश आशिष शेलार यांनी दिले. याशिवाय, दुष्काळी परिस्थितीमुळे मुंबईत स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबांसोबत येणाऱ्या बालकांची तातडीने नोंदणी करून त्यांना योग्य पोषण आहार आणि आवश्यक आरोग्य सेवा तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

अनेक अडचणींमुळे प्रत्यक्ष लाभार्थी शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची भीती

शासनाने पात्र शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, प्रत्यक्षात एखाद्या शेतकऱ्याचे नुकसान झाले असेल आणि केवळ तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणामुळे त्याला मदत मिळत नसेल, तर त्याला न्याय कोण देणार? शेतकऱ्याने कार्यालयां चे उंबरठे झिजवायचे, कागदपत्रे जमा करायची आणि शेवटी मदतीच्या प्रतीक्षेत राहायचे, ही परिस्थिती बदलली पाहिजे. आज प्रत्येक आमदार, खासदार, मंत्री आणि सत्ताधारी पक्षाच्या समर्थकांनी एकदा ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या घरात जाऊन दिवाळी पाहावी. शेतकऱ्याच्या घरात फराळासाठी किती साहित्य आहे, मुलांसाठी नवीन कपडे घेण्याची ऐपत आहे का, घरातील वृद्ध आई-वडिलांच्या औषधांसाठी पैसे आहेत का, याची चौकशी करावी. शेतकऱ्याच्या घरात दिवाळीचा दिवा पेटतो, पण त्याच्या मनातील चिंतेचा अंधार कायम असतो. एका बाजूला कर्जाचा डोंगर, दुसऱ्या बाजूला पिकांचे नुकसान आणि तिसऱ्या बाजूला बाजारभावाची अनिश्चितता. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांची मदत देऊन शेतकऱ्याने आनंदाने दिवाळी साजरी करावी, अशी अपेक्षा ठेवणे कितपत योग्य आहे? शेतकरी कधीही सरकारकडे मोफत पैसा मागत नाही. तो आपल्या कष्टाचा योग्य मोबदला मागतो. त्याच्या मालाला हमीभाव मिळावा, नैसर्गिक आपत्तीमध्ये योग्य नुकसानभरपाई मिळावी, शेतीला पुरेसे पाणी मिळावे, वीज वेळेवर मिळावी आणि कर्जाच्या ओझ्यातून बाहेर पडण्यासाठी ठोस उपाययोजना व्हाव्यात, एवढीच त्याची अपेक्षा आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. देशाची अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि ग्रामीण जीवनाचा कणा म्हणजे शेतकरी, असे भाषणांमधून वारंवार ऐकायला मिळते. मात्र, प्रत्यक्ष मदतीची वेळ येते तेव्हा याच अन्नदात्याच्या पदरात किती पडते, हा प्रश्न उपस्थित होतो. आज शासनाने विविध घटकांना बोनसच्या स्वरूपात दहा हजार रुपये, अर्ध्या पगाराइतकी रक्कम किंवा पूर्ण पगाराइतका लाभ दिल्याच्या चर्चा आहेत. काही ठिकाणी अधिकारी-कर्मचाऱ्यांना दिवाळीचा आर्थिक दिलासा मिळाला. यात गैर काहीच नाही. मेहनत करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला सणासुदीला आर्थिक मदत मिळालीच पाहिजे. पण मग वर्षभर ऊन, वारा, पाऊस आणि निसर्गाच्या लहरीपणाशी झुंज देणाऱ्या शेतकऱ्याचा विचार करताना शासनाची हात आखडता भूमिका का? शेतकऱ्याला दिवाळी साजरी करण्यासाठी पाच हजार रुपये देऊन शासनाने नेमके काय साध्य केले? एवढ्या महागाईच्या काळात पाच हजार रुपयांत शेतकऱ्याच्या कुटुंबाची दिवाळी साजरी होऊ शकते का? घरातील किराणा, मुलांचे कपडे, फराळाचे साहित्य, दिवाळीचे दिवे, तेल, साखर, तेलबिया, औषधे, शेतीसाठी लागणारे साहित्य आणि रोजच्या गरजा भागवताना पाच हजार रुपये किती दिवस पुरणार? ज्या शेतकऱ्याच्या घामातून देशाच्या ताटात अन्न येते, त्याच्या घरात मात्र सणाच्या दिवशी आर्थिक विवंचना असावी, ही कोणत्या विकासाची निशाणी आहे? शेतकऱ्याला मदत करताना पाच हजार रुपयांचा आकडा शासनाला मोठा वाटतो; पण त्याच शेतकऱ्याने वर्षभरात शेतीवर केलेला खर्च, घेतलेले कर्ज, बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि वीजबिल यांचा हिशेब कोण मांडणार? पाऊस वेळेवर पडला नाही तर शेतकरी संकटात, अतिवृष्टी झाली तर संकटात, गारपीट झाली तर संकटात, बाजारभाव पडले तर संकटात आणि पीक हातात आले तरी विक्रीची हमी नाही. म्हणजे शेतकऱ्याच्या आयुष्यात संकटांचा पाऊस कधी थांबणार? शासनाने ३०४ दुष्काळी तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांसाठी प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जाहीर केली असून, त्यासाठी ७,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही मदत सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांसाठी आहे. त्यामुळे शासनाने काहीच केले नाही, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. परंतु प्रश्न मदतीच्या घोषणेचा नसून मदतीच्या रकमेचा आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष गरजांचा आहे. पाच हजार रुपये ही केवळ तात्पुरती अग्रिम मदत आहे; संपूर्ण पीक नुकसानभरपाई नाही. शेतकऱ्याच्या शेतातील पीक वाळून गेले, कापसाचे नुकसान झाले, सोयाबीनला अपेक्षित भाव मिळाला नाही, फळबागा पाण्याअभावी करपल्या, तर त्याच्या नुकसानीची भरपाई पाच हजार रुपयांनी कशी होणार? एका एकरात पीक घेण्यासाठी हजारो रुपयांचा खर्च येतो. बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि मशागतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकऱ्याला पिकातून उत्पन्न मिळाले नाही तर त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा होणार? मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न, घरखर्च, आरोग्य आणि बँकेचे कर्ज यांची जबाबदारी कोण घेणार?

भारत खरोखर कृषिप्रधान आहे का? भारत कृषिप्रधान देश आहे, असे आपण म्हणतो. मात्र, देशाचा अन्नदाता आर्थिकदृष्ट्या सक्षम नसेल, त्याला सणासुदीला दोन पैसे



मदत जाहीर झाली खरी पण शेतकरी वंचित राहण्याची भिती असल्याने शेतकरी चिंतेत

खर्च करण्याची चिंता असेल, त्याच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न असेल, तर कृषिप्रधान देश असल्याचा अभिमान नेमका कशासाठी? शेतकरी जगला तर शेती जगेल, शेती जगली तर अन्नसुरक्षा टिकेल आणि अन्नसुरक्षा टिकली तर देशाची अर्थव्यवस्था मजबूत राहील. मग शेतकऱ्याच्या आर्थिक सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य का दिले जात नाही? शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी अधिवेशनात भाषणे होतात, घोषणा होतात, आश्वासने दिली जातात; पण प्रत्यक्ष मदतीच्या वेळी त्याच्या वाट्याला तुटपुंजी रक्कम येत असेल तर ही व्यवस्था आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. म्हणूनच राज्यातील प्रत्येक आमदार, खासदार, मंत्री आणि शासनाच्या निर्णयांचे समर्थन करणाऱ्या प्रत्येकाने या प्रश्नाचे उत्तर द्यावे. पाच हजार रुपये देऊन शेतकऱ्यांचे नेमके कोणते प्रश्न सुटणार आहेत? शेतीच्या एका हंगामात झालेल्या हजारो रुपयांच्या नुकसानीची भरपाई या रकमेतून कशी होणार? आणि महागाईच्या काळात या रकमेत शेतकऱ्याने कुटुंबाची दिवाळी कशी साजरी करावी? शेतकऱ्यांना केवळ दिवाळीपुरती मदत नको, तर वर्षभर सन्मानाने जगता येईल अशी आर्थिक व्यवस्था हवी. मदतीच्या घोषणा करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला शाश्वत आधार देण्याची गरज आहे. पाच हजार रुपयांचा अग्रिम दिलासा हा अंतिम उपाय होऊ शकत नाही. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, शेतकऱ्यांच्या घामावर देशाचे पोट भरते; पण त्याच शेतकऱ्याच्या घरात दिवाळी साजरी करण्यासाठी पैशांची कमतरता असेल, तर हा केवळ शेतकऱ्याचा प्रश्न नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या संवेदनशीलतेचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाची किंमत पाच हजार रुपयांत मोजू नका. अन्नदात्याला मदतीची भीक नको, तर त्याच्या कष्टाला न्याय आणि जगण्याला सन्मान हवा!

शेतकऱ्यांसाठी मदतीची घोषणा झाली की त्यानंतर नवीन प्रश्न निर्माण होतात. कोण पात्र, कोण अपात्र, किती नुकसान झाले, कोणत्या नोंदीत नाव आहे, फार्मर आयडी आहे का, ई-केवायसी झाली आहे का, बँक खाते आधारशी जोडले आहे का, अशा अनेक अडचणींमुळे प्रत्यक्ष लाभार्थी शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची भीती निर्माण होते.

पनवेलमध्ये १६ वर्षीय मुलाचा थरारक बचाव

दिवाळीचा आनंद साजरा करताना एक क्षणाचा निष्काळजीपणा किती महागात पडू शकतो, याचा धक्कादायक अनुभव पनवेलमध्ये एका कुटुंबाला आला. फटाके फोडण्यासाठी घराबाहेर पडलेला १६ वर्षांचा मुलगा थेट उड्डाणपुलावरून खाली कोसळला. दिवाळीचा आनंद साजरा करताना एक क्षणाचा निष्काळजीपणा किती महागात पडू शकतो, याचा धक्कादायक अनुभव पनवेलमध्ये एका कुटुंबाला आला. फटाके फोडण्यासाठी घराबाहेर पडलेला १६ वर्षांचा मुलगा थेट उड्डाणपुलावरून खाली कोसळला. सुमारे ४० ते ५० फूट खोलवर पडलेल्या या मुलाला अग्निशमन दलाच्या जवानांनी जीवाची बाजी लावून बाहेर काढले, त्यामुळे त्याचे प्राण वाचले. ही घटना १० नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास घडली. कर्नाळा स्पोर्ट्स परिसराजवळ नव्याने बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलावरून तो खाली पडला. हा पूल नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावर आहे. फटाक्यांच्या धमाक्यांमध्ये नेमके काय घडले, हे कळायच्या आतच मुलगा खोल भागात कोसळला होता. आजूबाजूच्या लोकांनी आरडाओरडा करताच परिसरात एकच गोंधळ उडाला. माहिती मिळताच पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलाची दोन वाहने सायरन वाजवत घटनास्थळी पोहोचली. मात्र घटनास्थळापर्यंत पोहोचणेही सोपे नव्हते. रस्ता नसल्यामुळे दोन जवानांनी तब्बल दीड किलोमीटर पायपीट करत खोल भागापर्यंत धाव घेतली. अंधार, खडकाळ जमीन आणि खोल दरी यामुळे बचावकार्य अधिकच अवघड झाले होते. जवानांनी परिस्थितीचा अंदाज घेत तातडीने अतिरिक्त मनुष्यबळ बोलावले. त्यानंतर तीन दोरखंड, बॉडी हार्नेस, हेल्मेट आणि टॉर्चच्या मदतीने खाली उतरण्याची तयारी करण्यात आली. एक जवान दोराच्या साहाय्याने हळूहळू खाली उतरला आणि जखमी अवस्थेत पडलेल्या मुलाला सुरक्षितपणे हार्नेसमध्ये बांधले. वरून इतर जवानांनी दोर खेचत दोघांनाही वर आणले. तब्बल तासभर चाललेल्या या थरारक प्रयत्नानंतर मुलाची सुटका करण्यात आली. त्याला तातडीने रुग्णवाहिकेतून रुग्णालयात हलवण्यात आले. बचाव झालेला मुलगा ओल्ड पनवेलमधील लाइन आळी परिसरातील रहिवासी असल्याची माहिती आहे. या मोहिमेत अग्निशमन दलाच्या पथकाने दाखवलेले धाडस आणि शिस्त याचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले. दरम्यान, या उड्डाणपुलावर अजूनही काही ठिकाणी बांधकाम सुरू आहे. त्यामुळे तिथे गर्दी करू नये आणि फटाके फोडू नयेत, असे आवाहन महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून करण्यात आले आहे. दिवाळीत आनंद साजरा करताना सुरक्षित ठिकाण निवडणे किती गरजेचे आहे, हे या घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

तपास ..

ड्रोन तंत्रज्ञान वापरात
चालतोपोलिसतपास
कार्यक्षम असूनसुद्धा
का यंत्रणा हो नापास

अद्ययावत फौजफाटे
तरीही तोकडा फास
देव बुडवूनि पाण्यात
करतात कडकउपास

श्वान पथक हिंडूलागे
पोटा ना टिकलाघास
काय असे गौडबंगाल
कमीपडतोय अभ्यास

कधी मिळतो गुन्हेगार
सर्वांना एवढाचं ध्यास
कमी असे इच्छाशक्ती
व्यक्त करतात कयास

इप्सितसाध्यप्रत्येकांस
अगदीचं विना सायास
चुकाआपल्या लपवाय
रे कसला विचित्रध्यास

गुन्हेगार सुटून न जाय
प्रमादाहवा विजनवास
तेंव्हा सामान्य जनाचा
सरून जाईल वनवास

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

ऑनलाईन ..

ऑनलाईन शॉपींगचे
वाढे अलिकडे प्रस्थ
हवे काय ते मागवावे
गादीवर लोळत मस्त

ट्रॅफिकजामयातायात
कशाला व्हायचे त्रस्त
नको फुकाची हमाली
मिळे घरपोचआश्वस्थ

प्रत्यक्ष खरेदी पेक्षाही
वस्तु कितीतरी स्वस्त
एकावर अनेकफुकट
भावही अतिशयरास्त

गुपचुप कापूद्या खिसा
सोसा दरोडे बिनधास्त
अनावश्यक वस्तु घेतो
भले खरेदी करे जास्त

ऑनलाईनचेमहाधोके
फसवाफसवीआक्रस्त
जरासे दुर्लक्षित राहता
अंगलट येणारं बेशिस्त

अनोळखी गर्दी घरात
गळून पडते सक्त गस्त
माहिती पुरवी अज्ञाता
काहीन करताशिकस्त

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

भारंभार ..

आहोत उच्च शिक्षित
पहा पदव्या भारंभार
कुणी या फसवून जा
मानलेआपले आभार

मोठ मोठ्या कंपनीत
गलेलठ्ठ घेतोयं प्रभार
नशेबाजी प्रेमात पाडे
करे हलका कामभार

आहो नेते उच्चपदस्थ
सर्वत्र पसरे कारभार
बाबां आशिर्वाद पाठी
दे काळ्यांकर्मा उभार

जन समस्या सोडवायं
भरवतो जनता दरबार
माझेप्रश्न सुटत नाहीत
श्रेष्ठी पुढे झुके हरबार

सहजते घडतातसगळे
पहा धर्मांतराचे प्रकार
कॉर्पोरेट लेबल मिरवी
अंतःकरणाभरे विकार

उघडपणे लुटवून घेतो
कसेकधी ना दे नकार
बाकीचे जसे गुन्हेगार
स्वताचाआधीधिक्कार

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

विषबाधा ..

कार्यक्रमात एखाद्या
नेमकी का विषबाधा
सरळ चालल्या गोष्टी
मध्येचं आणलीबाधा

ब्रेकिंग न्यूज पट् धूम
वेळ योग्यवेळी साधा
खरे काय खोटे काय
मनस्थिती होई द्विधा

पटवून देता लोकांना
उडणारं तिरपीट त्रेधा
परत यायचे सुखरूप
चक्रव्यूह जपूनि भेदा

खरा सूत्रधार कोण रे
खोलात जावून शोधा
सोक्षमोक्ष पुरता लावे
मुळांपर्यंत नीट खोदा

पीडीता इलाज आधी
निकरानेटाळे आपदा
उच्चतम रे माणूसकी
हीच तरी खरी संपदा

शिक्षा जबरदस्त हवी
कुटीलअशा अपराधा
अवैधमार्गावर अंकुश
काय सुप्तलुप्त इरादा

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

पान ४ वरून पान ४ वरून पान ४ वरून

मराठा आरक्षण आंदोलनातील

मंडळात केवळ चालक आणि वाहक अशा मर्यादित पदांच्याच संधी असल्याने अनेक सुशिक्षित वारसांवर अन्याय होत आहे. प्रतीक्षेत असलेल्या सर्व २७९ वारसांना विशेष बाब म्हणून एमआयडीसी, महापारेषण, महावितरण किंवा इतर शासकीय विभागांत त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे. यासाठी मंत्रालयीन स्तरावर तात्काळ विशेष बैठक बोलावून कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा, महामंडळांच्या लालफितीच्या कारभाराला चाप लावून वारसांना विनाविलंब नियुक्तीपत्रे वितरित करावीत,घरातील कर्ता माणूस गमावलेल्या या कुटुंबांच्या कायमस्वरूपी उपजीविकेसाठी शासकीय नोकरी हाच खरा आधार असून, मराठा समाजाच्या भावनांचा उद्रेक होण्यापूर्वी शासनाने यावर तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

बिरसा मुंडा जयंतीनिमित्त

माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. या सेवा सप्ताहांतर्गत आदिवासी समाजातील पात्र लाभार्थ्यांना न्यूक्लियस बजेट योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य व धनादेश वितरण, धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (D--JGU-), प्रधानमंत्री जनमन अभियान (PM-J-NM-N), महिला बचत गटांना लाभवाटप, स्वयंरोजगार व व्यवसायासाठी मार्गदर्शन, कृषीपूरक व्यवसाय, सिंचन सुविधा आणि आर्थिक स्वावलंबनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच दिनांक १४ नोव्हेंबर रोजी आदिवासी महापुरुषांच्या स्मारकांची स्वच्छता, पुतळ्यांची देखभाल व दीपोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. दिनांक १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त जिल्हा व तालुका स्तरावर अभिवादन कार्यक्रम, पुष्पांजली, आदिवासी महापुरुषांचा सन्मान, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच जनजागृती उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. या दिवशी आधार कार्ड दुरुस्ती व अद्ययावतीकरण, शासकीय कागदपत्रे, विविध योजनांसाठी अर्ज प्रक्रिया, वनहक्क पट्टेधारकांना शासकीय योजनांचा लाभ, कृषी विभागाच्या सेवा व शेतकरी योजनांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सेवा शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दिनांक १६ ते १८ नोव्हेंबरदरम्यान आदिवासी समाजाच्या गौरवशाली इतिहासाचे दर्शन घडविणाऱ्या शोभायात्रा, जनजातीय स्वाभिमान संमेलने, सांस्कृतिक मेळावे, लोककला, लोकनृत्य, पारंपरिक खेळ व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. पारधी समाजासह राज्यातील सर्व आदिवासी बांधवांना या उपक्रमांचा प्रत्यक्ष लाभ मिळणे आवश्यक आहे. विशेषतः आजही अनेक आदिवासी व पारधी कुटुंबे शासकीय योजनांपासून वंचित आहेत. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविणे, आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देणे, गायरान व वनजमिनीशी संबंधित पात्र प्रकरणांमध्ये कायदेशीर व प्रशासकीय मार्गदर्शन करणे, शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवारा आणि आर्थिक स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देणे यासाठी शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. भगवान बिरसा मुंडा यांची जयंती केवळ प्रतिमापूजनापुरती मर्यादित न राहता त्यांच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन आदिवासी समाजाला सामाजिक न्याय, सन्मान, हक्क आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा संकल्प या सप्ताहातून प्रत्यक्ष कृतीत उतरविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. या सेवा सप्ताहामध्ये सर्व आदिवासी बांधवांनी, सामाजिक संघटनांनी, युवकांनी, महिला बचत गटांनी आणि लोकप्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

तळणी येथे विधवा

या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शिधा मिळाल्याने लाभार्थी महिलांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गौतम सदावर्ते यांनी केले यावेळी सरपंच गौतम सदावर्ते, ग्रामपंचायत सदस्य कृष्णा सरकटे, बबनसिंग चव्हाण, माणिक सरकटे, कैलास सरकटे, लक्ष्मण सरकटे, प्रभाकर मस्के, महादेव सरकटे,भागवत मुर्तडकर, गोपाल सरकटे, कृष्णा वाघमोडे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

लोकसंख्या कमी असतानाही

बाबत महानगरपालिकेचा सकारात्मक दृष्टिकोन असल्याचे स्पष्ट केले. माजी आमदार संतोष सांबरे, शिवनाथ राठी आणि शरद काबरा यांनीही मनोगत व्यक्त केले.

उद्घाटक डॉ. जुगलकिशोर भाला यांनी देशाच्या विकासात मारवाडी समाजाचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत, समाजबांधवांनी संघटित होऊन सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. दीपावली स्नेहमिलनासारख्या उपक्रमांतून सामाजिक एकतेचा आणि समतेचा संदेश दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोप करताना गौतमसिंह मुनोत म्हणाले की, प्रामाणिकपणे व्यवसाय करून देशाच्या विकासात योगदान देणारा मारवाडी समाज सामाजिक बांधिलकीही जपतो. भूकंप, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या काळात समाजाने मोठ्या प्रमाणात मदतकार्य करून आपले सामाजिक भान सिद्ध केले आहे. समाजाच्या अधिक प्रगतीसाठी सर्वांनी संघटित होण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात नगरसेवक विरेंद्रप्रकाश धोका यांनी मारवाडी समाजाच्या देशाच्या विकासातील योगदानाचा आढावा घेतला. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानासंदर्भातील न्यायालयीन लढा जिंकून महानगरपालिकेची कोट्यवधी रुपयांची मालमत्ता सुरक्षित ठेवण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. शब्बीर अली उद्यानाची जागाही न्यायालयीन लढ्याद्वारे महानगरपालिकेच्या ताब्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच शहरातील मारवाडी समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून स्नेहमिलनाचे उद्घाटन करण्यात आले. सूत्रसंचालन मनीष तवरावाला यांनी केले, तर चेतन बोथरा यांनी आभार मानले. यावेळी मारवाडी संमेलनाचे जिल्हा कार्याध्यक्ष गोविंदप्रसाद मुंदडा, स्वागताध्यक्ष संजय राठी, जनसेवा ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला, महेश भक्कड, रमेशचंद्र अग्रवाल, शाम लखोटिया, विरेंद्र रूणवाल, उमेश बजाज, विष्णू चेचानी, विजय जैन, पवन जोशी, दिनेश बरलोटा, लक्ष्मीनारायण मानधना, राम सोमानी, अलकेश देविदान, निखिल तायल, सुशील खंडेलवाल, बालाप्रसाद भक्कड, दामोदर बजाज, दर्पण सकलेचा यांच्यासह मारवाडी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठा आरक्षण आंदोलनातील हुतात्म्यांच्या वारसांना तातडीने शासकीय सेवेत सामावून घ्या : अरविंद देशमुख

जालना/प्रतिनिधी : मराठा आरक्षणाच्या आंदोलनात बलिदान दिलेल्या ३०९ आंदोलकांच्या वारसांना शासकीय सेवेत नोकरी देण्याच्या आश्वासनाची शासनाने तात्काळ पूर्तता करावी, असे साकडे मराठा महासंघाच्यावतीने जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना घातले.

शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी सोमवार दि. ९ नोव्हेंबर रोजी जालना दौऱ्यावर आलेले उपमुख्यमंत्री शिंदे यांची सायंकाळी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या निवासस्थानी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अशोक पडूळ, प्रा. संतोष संतोष कऱ्हाळे, प्रभाकर केदारे. इंजि. शुभम टेकाळे,सुदर्शन देशमुख यांनी त्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. याप्रसंगी युवा सेनेचे राज्य सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची उपस्थिती होती. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, २०१६ पासून



राज्यभरात झालेल्या मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान समाजातील ३०९ बांधवांनी आपले प्राण पणाला लावून बलिदान दिले. या हुतात्मा आंदोलकांच्या कुटुंबीयांना शासकीय अथवा निमशासकीय महामंडळात नोकरी देण्याचे आश्वासन शासनाने दिले होते. मात्र, प्रत्यक्षात या आश्वासनाची पूर्तता न होता केवळ ३० वारसांना एसटी महामंडळात नियुक्ती देण्यात आली असून, उर्वरित २७९ वारस अजूनही नोकरीच्या प्रतीक्षेत न्यायासाठी दारोदार भटकत आहेत.

एमआयडीसी, महापारेषण तसेच महानिर्मिती यांसारख्या सक्षम महामंडळांमध्ये या वारसांना सामावून घेण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. तरीही अनुकंपा तत्त्वावरील प्रलंबित याद्यांचे कारण पुढे करून महामंडळांकडून जागा उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच एसटी महा (पान ३ वर)

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना मदतीचा हात;आ. हिकमत उढाण यांच्या हस्ते किराणा किट वाटप!



किशोर मोरे /घनसावंगी :मतदारसंघातील बोरगाव तांडा क्रमांक १ व २ येथे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांची दिवाळी गोड व्हावी आणि त्यांना दिलासा मिळावा, या उद्देशाने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या वतीने किराणा किट पाठविण्यात आल्या होत्या. या किराणा किटचे आज आमदार हिकमत दादा उढाण यांच्या हस्ते बोरगाव तांडा क्रमांक १ व २ येथील शेतकरी बांधवांना वाटप करण्यात आले. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात देण्याचा हा संवेदनशील उपक्रम ठरला. या मदतीमुळे शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून त्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित झाला. संकट कितीही मोठे असो, शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात शिवसेना सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

बिरसा मुंडा जयंतीनिमित्त जनजातीय गौरव दिन सेवा सप्ताह आयोजन



जालना : आदिवासी समाजाचे महानायक, स्वातंत्र्यसैनिक आणि जल-जंगल-जमीनच्या हक्कांसाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष करणारे क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात दिनांक ११ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जनजातीय गौरव दिन सेवा सप्ताह-२०२६ साजरा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ रोजी शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१६४/जपुक (२९) निर्गमित करून या सप्ताहाच्या आयोजनाबाबत निर्देश दिले आहेत. या उपक्रमासाठी आदिवासी विकास विभाग हा नोडल विभाग म्हणून काम पाहणार असून विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच संबंधित शासकीय यंत्रणांमार्फत विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ रोजी पत्रकार परिषद आयोजित करून जनजातीय गौरव दिन सेवा सप्ताहाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची आणि आदिवासी समाजासाठी असलेल्या विविध शासकीय योजनां (पान ३ वर)

दुष्काळाचे सावट असतांनाही धोपटेश्वरची कुस्ती परंपरा कायम!

दावल मालिक पीर बाबा यात्रेनिमित्त भव्य कुस्ती दंगल; महिला मल्लांचाही आखाड्यात दमदार सहभाग, पंचक्रोशीतील कुस्तीप्रेमींची अलोट गर्दी

नवनाथ गव्हाणे बदनापूर / प्रतिनिधी : धोपटेश्वर :दुष्काळाचे सावट, आर्थिक अडचणी आणि प्रतिकूल परिस्थिती... मात्र या संकटांपुढे गावाची परंपरा झुकली नाही! दावल मालिक पीर बाबा यांच्या यात्रेनिमित्त धोपटेश्वर येथे सालाबादप्रमाणे यंदाही कुस्त्यांच्या भव्य दंगलीचे आयोजन करण्यात आले होते. अनेक वर्षांची परंपरा अखंडित ठेवण्यासाठी ग्रामस्थांनी एकजुटीने पुढाकार घेत आखाड्याचे उत्कृष्ट नियोजन केले. या कुस्ती दंगलीत पंचक्रोशीतील नामांकित मल्लांनी सहभाग नोंदवत आपल्या कुस्ती कौशल्याचे शानदार प्रदर्शन केले. मल्लांचे चित्तथरारक डावपेच, ताकदीची झुंज आणि विजयासाठीची जिद्द यामुळे आखाड्यात चांगलीच रंगत निर्माण झाली होती. प्रत्येक कुस्तीला उपस्थित प्रेक्षकांकडून टाळ्यांच्या कडकडाटात आणि उत्स्फूर्त प्रतिसादात दाद मिळत होती. विशेष आकर्षण ठरला महिला मल्लांचा सहभाग! पुरुष मल्लांसोबतच महिला कुस्तीपटूंनीही आखाड्यात उतरून आपल्या कुस्ती कौशल्याची चुणूक दाखवली. महिला मल्लांचा सहभाग उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरला. त्यांच्या जिद्दीने आणि आत्मविश्वासाने ग्रामीण भागातील महिला







संतोष दाभाडे
कमेटी अध्यक्ष

दावल मालिक पीर बाबा यांच्या यात्रेनिमित्त धोपटेश्वर येथे भरविण्यात येणारा कुस्ती आखाडा ही आमच्या गावाची पिढ्यान्पिढ्यांची गौरवशाली परंपरा आहे. काळ बदलला, परिस्थिती बदलली, संकटे आली; मात्र गावकऱ्यांनी ही परंपरा कधीही खंडित होऊ दिली नाही. कुस्ती ही केवळ खेळाची स्पर्धा नसून ग्रामीण संस्कृतीचा आणि गावाच्या एकतेचा अभिमान आहे. विशेषतः महिला कुस्तीपटूंचा सहभाग ही अभिमानास्पद बाब असून, पुढील पिढीलाही या परंपरेची प्रेरणा मिळत राहावी, हाच आमचा प्रयत्न आहे.

क्रीडापटूंना प्रोत्साहन देणारा संदेश दिला. पंचक्रोशीतील कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या दंगलीचा मनमुराद आनंद लुटला. विशेष म्हणजे, यंदा परिसरात दुष्काळी परिस्थिती असतानाही ग्रामस्थांनी गावची परंपरा जपण्यासाठी दाखवलेली एकजूट आणि उत्साह कौतुकास्पद ठरला. धार्मिक श्रद्धा, ग्रामीण संस्कृती, गावाची एकजूट आणि कुस्ती परंपरेचा सुंदर संगम या निमित्ताने पाहायला मिळाला. ग्रामस्थांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे यात्रेतील कुस्ती दंगल उत्साहात पार पडली. अशा पारंपरिक आखाड्यांमुळे ग्रामीण भागातील कुस्ती संस्कृतीला बळ मिळत असून नव्या पिढीतील मल्लांनाही प्रेरणा मिळत आहे.

गावच्या शाळेसाठी युवकांची डिजिटल एकजूट; अवघ्या चार दिवसांत ८० हजारांचा निधी जमा!

व्हॉट्सपच्या एका ग्रुपमधून शैक्षणिक परिवर्तनाची चळवळ; आजी-माजी विद्यार्थी, ग्रामस्थ, पालकांचा उत्स्फूर्त सहभाग

किशोर मोरे /घनसावंगी : गावाच्या विकासासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीतून योगदान देण्याचा आदर्श सिंदखेड येथील युवकांनी घालून दिला आहे. गावातील जिल्हा परिषद शाळेचा चेहरामोहरा बदलून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, या उद्देशाने युवकांनी पुढाकार घेतला आहे. विशेष म्हणजे, व्हॉट्सपच्या माध्यमातून सुरू केलेल्या निधी संकलन मोहिमेला अवघ्या तीन ते चार दिवसांत मोठा प्रतिसाद मिळाला असून, तब्बल ८० हजार रुपयांचा निधी जमा झाला आहे. आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक, ग्रामस्थ आणि दानशूर व्यक्तींनी या उपक्रमाला उत्स्फूर्त साथ दिली आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरातील शाळांच्या तोडीच्या शैक्षणिक सुविधा मिळणे गरजेचे आहे. मात्र, वाढत्या शैक्षणिक खर्चामुळे अनेक पालकांना आपल्या पाल्यांना शहरात किंवा इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षणासाठी पाठवणे परवडत नाही. हीच बाब लक्षात घेऊन आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळाच आधुनिक तंत्रज्ञानाने समृद्ध करून विद्यार्थ्यांना गावातच दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचा संकल्प युवकांनी केला आहे.

या उपक्रमासाठी व्हॉट्सपवर स्वतंत्र ग्रुप तयार करण्यात आला असून, शाळेतील शिक्षकांशी चर्चा करून विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या साहित्याची यादी आणि खरेदी खर्चाचे नियोजन करण्यात येत आहे. यामध्ये स्मार्ट एलईडी बोर्ड, प्रोजेक्टर, संगणक (PC),



विविध शैक्षणिक साहित्य तसेच प्रयोगशाळेसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणासोबतच डिजिटल माध्यमातूनही ज्ञान घेण्याची संधी मिळणार आहे.

केवळ निधी संकलन नव्हे, तर पारदर्शक नियोजनाचा संकल्प!

या उपक्रमातून जमा होणारा निधी केवळ शाळेच्या शैक्षणिक विकासासाठीच वापरण्यात येणार आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक साहित्याची टप्प्याटप्प्याने खरेदी करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना प्राधान्य दिले जाणार आहे. अवघ्या काही दिवसांत ८० हजार रुपयांचा निधी जमा होणे ही गावातील आजी-माजी विद्यार्थ्यांची शाळेविषयी असलेली आपुलकी, युवकांची सामाजिक बांधिलकी आणि ग्रामस्थांच्या एकजुटीची साक्ष देणारी बाब ठरली आहे. आर्थिक सहकार्य करणाऱ्या सर्व देणगीदारांचे आयोजकांनी आभार मानले असून, उर्वरित ग्रामस्थ, युवक, नोकरदार, व्यावसायिक, पालक आणि माजी विद्यार्थ्यांनीही आपल्या आर्थिक क्षमतेनुसार योगदान देऊन या शैक्षणिक चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. गाव बदलायचे असेल तर शिक्षण बदलले पाहिजे आणि शिक्षण बदलायचे असेल तर शाळा सक्षम झाली पाहिजे. सिंदखेडच्या युवकांनी एकत्र येत सुरू केलेला हा उपक्रम केवळ शाळेच्या आधुनिकीकरणापुरता मर्यादित नसून, गावाच्या पुढील पिढीचे भविष्य घडविण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आजची ही एकजूट उद्याच्या उज्ज्वल भविष्याची नांदी ठरणार आहे!

तळणी येथे विधवा महिलांसह गरजू कुटुंबांना दिवाळी शिध्याचे वाटप

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात

तळणी (वा) : दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी, विधवा महिला आणि गरजू कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी, या सामाजिक भावनेतून शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून रविवार (ता. ८) तळणी येथे दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले.

शिवसेना नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार अर्जुनराव खोतकर आणि खासदार संजय जाधव यांच्या सहकार्याने पाठविण्यात आलेल्या शिध्याचे वाटप शिवसेना जिल्हाप्रमुख तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ए. जे. पाटील बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन केशवराव सरकटे यांच्या



दुष्काळामुळे शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. अशा परिस्थितीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून आणि शिवसेना जिल्हाप्रमुख कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ए. जे. पाटील बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गरजू कुटुंबांना दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमातून संकटाच्या काळात गरजू कुटुंबांना आधार देण्याचा आणि त्यांच्या दिवाळीत आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.
-केशवराव सरकटे संचालक, कृउबा समिती तथा चेअरमन, तळणी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनिताताई पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांनी संकटकाळात जनतेला अग्रिम मदत व पीएम किसान अनुदान देऊन नेहमीच खंबीर पाठीशी उभे राहिले आहे. आता ए. जे. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व केशवराव सरकटे यांच्या नेतृत्वात मिळालेला हा शिधा म्हणजे सरकारचा संवेदनशील चेहरा आहे.
ज्ञानेश्वर सरकटे (युवा नेते,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

नेतृत्वाखाली करण्यात आले.

दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले असून, विधवा महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसमोर दिवाळी साजरी करण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. अशा कुटुंबांना सणाच्या काळात आधार मिळावा आणि त्यांच्या घरातही आनंदाचा दिवा उजळावा, (पान ३ वर)

ज्येष्ठ नेते उद्धवराव गाडगे यांचे निधन



वाहेगाव (श्रीष्टी) येथे शोककळा; राजकीय व सामाजिक क्षेत्रातून श्रद्धांजली परतूर, दि. ९ (प्रतिनिधी) : तालुक्यातील वाहेगाव (श्रीष्टी) येथील ज्येष्ठ नागरिक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष उद्धवराव श्रीपतराव गाडगे यांचे रविवारी मध्यरात्री १२.१५ वाजता वयाच्या ९० व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. उद्धवराव गाडगे हे माजी आमदार वैजनाथराव आकात यांचे खंदे समर्थक म्हणून परिचित होते. त्यांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष, खरेदी-विक्री संघाचे संचालक यांसह विविध पदांची जबाबदारी सांभाळली होती. राजकीय आणि सहकार क्षेत्रात त्यांनी दीर्घकाळ काम केले. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाचे) परतूर तालुकाध्यक्ष बाबासाहेब गाडगे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, पाच विवाहित मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. वाहेगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, सहकार क्षेत्रातील पदाधिकारी तसेच गावातील आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना अखेरचा निरोप दिला. त्यांच्या निधनाने गाडगे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

लोकसंख्या कमी असतानाही देशाच्या जीडीपीमध्ये मारवाडी समाजाचे मोठे योगदान : कैलास गोरंट्याल

जालना (प्रतिनिधी) : देशाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत मारवाडी समाजाची लोकसंख्या कमी असली, तरी देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात (जीडीपी) या समाजाचे मोठे योगदान आहे. व्यापार-उद्योगासोबतच सामाजिक कार्यातही मारवाडी समाज नेहमीच अग्रेसर राहिला असून, संकटकाळात समाजातील गरजूंना मदतीचा हात देण्याची परंपरा या समाजाने जपली आहे, असे गौरवोद्गार माजी आमदार तथा भाजप नेते कैलास गोरंट्याल यांनी काढले. अखिल भारतीय मारवाडी संमेलनाच्या जालना शाखेतील मारवाडी युवा मंच व मारवाडी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने सोमवारी (दि. ९) रुखिमणी गार्डन येथे आयोजित सर्वधर्मीय दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमात ते बोलत होते. अखिल भारतीय जैन श्वेतांबर सोशल ग्रुप फेडरेशनचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष गौतमसिंह मुनोत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योजक तथा ज्येष्ठ समाजसेवक डॉ. जुगलकिशोर भाला यांच्या हस्ते झाले.

यावेळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, भाजपचे जिल्हा महानगराध्यक्ष भास्कर दानवे, उद्योजक घनश्यामदास गोयल, माजी आमदार संतोष सांबरे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच जेपीसी बँकेचे अध्यक्ष सतीश पंच, जनसेवा ग्रुपचे उपाध्यक्ष नरेश गुप्ता, सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र पहाडे, नगरसेवक महावीर ढक्का, मनोज जोशी, ललित विजावत, मारवाडी संमेलनाचे प्रदेश महामंत्री सुदेश करवा, प्रदेश उपाध्यक्ष उमेश पंचारिया, शिवलाल राठी आदींची उपस्थिती होती.

गोरंट्याल पुढे म्हणाले की, देशाची लोकसंख्या सुमारे १४० कोटी असून, त्यामध्ये



मारवाडी भाषा बोलणाऱ्या विविध समाजघटकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. मारवाडी समाजाने व्यापार-उद्योगाच्या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी दिली असून, नैसर्गिक आपत्ती आणि संकटाच्या काळातही सामाजिक बांधिलकी जपत मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. जालना शहरातील मारवाडी समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लावून रामतीर्थ स्मशानभूमीच्या धर्तीवर तिचा विकास करण्यासाठी आपण पुढाकार घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. जालना शहराच्या सर्वांगीण विकासासाठी २०५० पर्यंतचे नियोजन करण्यात आले असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १२०० कोटी रुपये खर्चाच्या नवीन जलवाहिनी व जलशुद्धीकरण केंद्राच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शहरवासीयांना आठ दिवसांतून एकदा पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आल्याची माहितीही गोरंट्याल यांनी दिली.

भाजपचे जिल्हा महानगराध्यक्ष भास्कर दानवे म्हणाले की, समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम मारवाडी समाज सातत्याने करीत आहे. सामाजिक समरसतेचा संदेश देणारा सर्वधर्मीय दीपावली स्नेहमिलनाचा उपक्रम मराठवाड्यातील वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले.

मारवाडी संमेलनाचे जिल्हाध्यक्ष सुभाषचंद्र देविदान यांनी समाजबांधवांनी संघटित होऊन समाजाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करावेत, तसेच लोकसंख्या वाढीसाठीही सकारात्मक विचार करावा, असे आवाहन केले. उपमहापौर राजेश राऊत यांनी मारवाडी समाजाच्या विविध सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. महापौर वंदना मगरे यांनी मारवाडी समाजाच्या प्रलंबित मागण्यां (पान ३ वर)